# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

## (गट "क" संवर्गातील पद भरती कामाबाबत)

## अल्प मुदतीची निविदा सूचना

---

जिल्हाधिकारी, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समिती अंतर्गत गट "क" संवर्गातील पद भरती अंतर्गत खालील संगणकीय कामासाठी इच्छुक एजन्सी कडून दोन लिफाफा पध्दतीनुसार निविदा मागविण्यात येत आहे.

सदर कामांकरिता निविदा अर्ज दि. २१.०७.२०१६ ते २८.०७.२०१६ पर्यंत दुपारी २.०० वाजेपर्यंत (शासकीय सुटीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत रु.५००/- रोख भरुन विक्रीस आस्थापना शाखेमध्ये उपलब्ध राहतील व दि.२१.०७.२०१६ ते २८.०७.२०१६ दुपारी ३.०० पर्यंत वाजेपर्यंत निविदा निवड समितीच्या कार्यालयात स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि.२९.७.२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता निवड समितीच्या कार्यालयात उघडण्यात येतील. निविदा अर्ज, अटी व शर्तीसह सविस्तर माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, (आस्थापना शाखा) अमरावती तसेच amravati.nic.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(किरण गित्ते)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा निवड समिती, अमरावती

# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

## (गट "क" संवर्गातील पद भरती कामाबाबत)

## अल्प मुदतीची निविदा सूचना

---

जिल्हाधिकारी, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समिती अंतर्गत गट "क" संवर्गातील पद भरती अंतर्गत खालील संगणकीय कामासाठी इच्छुक एजन्सी कडून मागवावयाच्या निवीदा सुचनामध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

कामाचे स्वरुप पदनिहाय व जातप्रवर्गनिहाय खालीलप्रमाणे आहे.

१. पदभरती प्रक्रियेकरिता संकेतस्थळ तयार करणे. *Domain* रजिस्ट्रेशन करणे.

२. पदभरती प्रक्रियेकरिता मोडयुल तयार करणे.

३. अर्ज स्विकृती केंद्राची उभारणी करणे.

४. उमेदवारांकडून ऑन लाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये केंद्र उभारणे.

५. उमेदवारांकडून ऑन लाईन पध्दतीने अर्ज स्विकारणे.

६. उमेदवाराने ऑन लाईन अर्ज भरल्यानंतर संगणीकृत चलान तयार करणे.

७. उमेदवाराने चलान बँकेत भरल्यानंतर *Transition ID Update* करणे.

८. उमेदवाराने ऑन लाईन अर्ज भरल्यानंतर त्यांची प्रिंट काढून शैक्षणिक, जात व इतर अनुषंगीक प्रमाणपत्र, बँकेत भरलेल्या चलानचे प्रतीसह अर्ज स्विकृतीकेंद्रामध्ये अर्ज स्विकारुन कार्यालयात जमा करणे.

९. दररोज प्राप्त होणाऱ्या अर्जाची आकडेवारी निवड समितीस कळविणे.

१०. पात्र/ अपात्र उमेदवारांची यादी तयार करणे.

११. लेखी परीक्षेकरिता परीक्षा केंद्रानुसार प्रवेशपत्र तयार करुन पाठविणे.

१२. परीक्षा केंद्र निहाय हजेरीपट तयार करणे.

१३. पदभरती व अंतिम निकाल प्रक्रियेची संपूर्ण माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करणे.

१४. पद भरती कार्यक्रमानुसार आवश्यक असणाऱ्या याद्या व कामे विहीत कालावधीत पूर्ण करणे.

१५. निवीदा फॉर्म तसेच अटी व शर्ती मध्ये नमूद कामाच्या व्यतिरिक्त भरती प्रक्रिये करीता आवश्यक असलेले कोणतेही काम जिल्हाधिकारी यांचे निर्देशानुसार करावे लागेल.

१६. डाटा एन्ट्री करावयाचे सॉफ्टवेअर या कार्यालयाव्दारे पुरविण्यात येईल व त्याचे मूल्य कामाच्या एकूण किंमतीमधून कमी करण्यात येईल. निवीदाधारकाकडे सॉफ्टवेअर उपलब्ध असल्यास त्याचे प्रात्यक्षिक त्यांना सादर करता येईल. तथापि, याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम राहील व तो सर्व निवीदाधारकांना बंधनकारक असेल.

(अ) इच्छुक संगणक एजन्सीने वरील सर्व कामांकरिता प्रती अर्ज असलेले दरासह निविदा अर्ज अर्ज दि. २१.०७.२०१६ ते २८.०७.२०१६ पर्यंत दुपारी २.०० वाजेपर्यंत (शासकीय सुटीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत रु.५००/- रोख भरुन विक्रीस आस्थापना शाखेमध्ये उपलब्ध राहतील व दि.२१.०७.२०१६ ते २८.०७.२०१६ दुपारी ३.०० पर्यंत वाजेपर्यंत निविदा निवड समितीच्या कार्यालयात स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि.२९.७.२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता निवड समितीच्या कार्यालयात उघडण्यात येतील.

(ब) निविदा व अटी व शर्ती निविदा अर्जासोबत दिलेल्या आहेत.

(क) निविदा दोन/ लिफाफे पध्दतीनेच भरावे लागतील.

**लिफाफा क्र.१ तांत्रिक निविदेचा लिफाफा :**

सदर लिफाफयावर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती अमरावती अंतर्गत गट "क" संवर्गातील पद भरती कामाबाबत तांत्रिक लिफाफा असे लिहावे.

**लिफाफा क्र.१ मध्ये खालील कागदपत्र असणे आवश्यक आहे.**

१. संगणक एजन्सीला असलेले शासनमान्य प्रमाणपत्र.
२. फक्त राष्ट्रीयकृत बँकेचा सदस्य सचिव, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवड समिती अमरावती यांचे नावाचा अनामत रक्कम रु. ५०००/- चा धनाकर्ष.
३. आयकर भरल्याबाबतचे प्रमाणपत्र/ पुरावा.
४. सर्व्हर/ संगणक/ प्रिंटर उपलब्धतेबाबत तपशिलवार माहिती.

वरिल सर्व प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती लिफाफा क्र. १ मध्ये सादर कराव्यात. मात्र निविदा उघडण्याचेवेळी लिफाफा क्र.१ मध्ये सादर केलेल्या सर्व मूळ प्रमाणपत्रे निविदा उघडतेवेळी निविदाधारकाने पडताळणीसाठी स्वत:जवळ ठेवणे आवश्यक राहील.

**लिफाफा क्र.२ व्यापारिक /दरासंबंधीचा लिफाफा (प्राईस टेंडर फॉर्म) :**

सदर लिफाफयावर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवड समिती अमरावती अंतर्गत गट "क" संवर्गातील पद भरती व्यापारिक लिफाफा असे लिहावे.

या लिफाफयामध्ये उपरोक्त नमूद कामाकरिता प्रती अर्ज दर नमूद करावे. दर नमूद करण्याचे आधी निविदेच्या अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचाव्यात.

लिफाफा क्र.१ अगोदर उघडला जाईल. त्यामध्ये विहीत कागदपत्रे नसतील तर लिफाफा क्र.२ उघडण्यात येणार नाही. म्हणजेच ती निविदा नामंजूर समजण्यात येईल.

निविदा उघडण्याची तारीख व वेळ तसेच निविदेतील कोणतीही अट शिथील करण्याचे बदलविण्याचे अथवा रद्द करण्याचे अधिकार कार्यालयाने राखून ठेवलेले आहेत.

(किरण गित्ते)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा निवड समिती, अमरावती

# महाराष्ट्र शासन

अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय

(गट "क" संवर्गातील पद भरती कामाबाबत-अल्प मुदतीची निविदा सूचना)

## अटी व शर्ती

१. कंत्राटाचा कालावधी हा जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून निवड प्रक्रीयेचे काम प्रत्यक्षात संपेपर्यंत अंमलात राहील.

२. निवड प्रक्रीयेच्या कामाचे आदेश जिल्हाधिकारी अथवा ते ज्या सक्षम अधिकाऱ्यांना प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यांनी स्पष्ट आदेश दिल्यापासुन यासंबंधीची कामे अपेक्षित राहील, अन्यथा करारनामा संपुष्टात येईल.

३. निवीदेसोबत अनामत रक्कम रु.५०००/- (अक्षरी रुपये पांच हजार फक्त) जिल्हाधिकारी अमरावती या नावाने धनाकर्ष (डी.डी.) व्दारा जमा करावी लागेल.

४. निवीदा धारकाने राष्ट्रीयकृत बँकेची गॅरेंटी रुपये ५०,०००/-(रुपये पन्नास हजार फक्त) संबंधी हमीपत्र (सी.डी.आर.) करारनाम्याचे वेळी सादर करणे बंधनकारक आहे.

५. कंत्राटदार यांनी निवीदा सादर करतेवेळी निवीदा प्रपत्रात नमुद केलेल्या तपशिल नुसार कामाचा नमूना *(Sample)* उपलब्ध करुन द्यावे व त्यानुसार कामाचा दर्जा कायम राखणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

६. निविदाधारकाला संकेतस्थळ उपलब्ध करुन दयावे लागेल व प्रत्येक तालुक्यातील ऑनलाईन केंद्राची यादी सादर करावी लागेल.

७. वरील काम हे निवीदा प्रमाणे केले याबाबत सक्षम अधिकारी यांनी प्रमाणपत्र दिल्याशिवाय कंत्राटदार यांना देयकाची अदायगी करण्यांत येणार नाही.

८. निवीदा प्रमाणे काम करतांना यासंबंधी कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास त्यासंबंधी सक्षम अधिकारी यांचेकडुन चौकशी करण्यांत येईल. त्यामध्ये निवीदा धारक दोषी आढळुन आल्यास करारनामा तात्काळ संपुष्टात येईल.

९. निवड प्रक्रीयेचे वेळी भविष्यात उमेदवारांचे संख्येत वाढ झाल्यास त्यानुसार जबाबदारी सांभाळणे बंधनकारक राहील.

१०. कामाच्या नमुन्या नुसार उमेदवरांना द्यावयाची प्रवेशपत्रे त्यावरील मजकुर, व कार्यालयास वेळोवेळी द्यावयाची माहीती ही स्पष्ट व निटनेटकी राहील याची खबरदारी घ्यावी लागेल.

११. निवीदेप्रमाणे काम करतांना कंत्राटदार अथवा त्यांचे प्रतिनीधी यांना होणाऱ्या नुकसानीबाबत जसे- अपघात, आग लागणे, भाववाढ, इतर नैसर्गीक अथवा मानवनिर्मीत आपत्तीमुळे कंत्राटदाराच्या होणाऱ्या कुठल्याही नुकसानी बाबतची भरपाई कंत्राटदाराला दिली जाणार नाही.

१२. निवीदामध्ये दर्शविलेल्या ठीकाणी यासंबंधी सर्व रेकॉर्ड सुरक्षीत राहील याची वेळोवेळी खबरदारी घ्यावी.

१३. पदभरती प्रक्रियेचे कामामधून उपलब्ध माहीती, आकडेवारी,विश्लेषण इ. चा परस्पर वापर अथवा विल्हेवाट निवीदा-धारकाला स्वत:साठी किंवा इतरांसाठी करता येणार नाही.

१४. कामाचे कालबध्द कार्यक्रमात कंत्राटदाराचे चुकीमुळे विलंब अथवा बाधा निर्माण निर्माण झाल्यास प्रतिदिन रु.५०,००/-(अक्षरी रुपये पाच हजार फक्त) किंवा जिल्हाधिकारी निश्चीत करतील त्यानुसार दंड आकारुन वसुल करण्यांत येईल.

१५. कामासंबंधी ठेवावयाचे लेखे, रोजनिशी, विवरणे व पत्रव्यवहाराचे स्वरुप हे सक्षम अधिकारी निश्चीत करुन देतील त्यानुसार कार्यवाही करावी लागेल.

१६. काम असामाधानकारक आढळुन आल्यास मंजुर निवीदा नुसार दिलेले काम अथवा कामाचा काही भाग काढुन घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.

१७. निवीदेतील अटींचा भंग केल्यामुळे अथवा निवीदाधारकाचे गैरकृतीमुळे निवीदाधारक यांचेकडुन काम काढुन घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना असुन सदर काम हे दुसऱ्या कंत्राटदाराकडुन करुन घेतले जाईल. त्याप्रित्यर्थ मंजुर निवीदेपेक्षा जास्तीचा खर्च व फरकाची रक्कम व आकारलेल्या दंडाची रक्कम ही मूळ कंत्राटदाराकडुन वसुल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

१८. ज्याची निवीदा स्विकृत करण्यांत येईल त्या कंत्राटदारास रुपये १००/-(रुपये शंभर फक्त) चे स्टॅम्प पेपरवर तात्काळ करारनामा विहीत नमुन्यांत द्यावा लागेल. करारनामा जरी केला असला तरीही कोणतेही कारण न देता करार रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, अमरावती यांना राहील.

१९. कंत्राटदारास भारतीय दंड संहीतेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली असल्यास / काळ्या यादीत घोषीत केले असल्यास अशा कंत्राटदारांनी स्वत: अथवा त्यांचे नातेवाईकांचे नावाने निवीदा भरु नये, अशा कंत्राटदारांना देण्यांत येणारी निवीदा रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

२०. निवीदाधारकाने निवीदामधील कोणत्याही अटीचा भंग केल्यास त्याची अमानत रक्कम जप्त करण्यांत येईल व केलेल्या कामाचा मोबदला देय राहणार नाही.

२१. वरील अटी व शर्ती मध्ये फेरबदल करण्याचा, काही नविन अटी व शर्ती समाविष्ट करण्याचा तसेच काही अटी व शर्ती शिथील करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांनी स्वत:कडे राखुन ठेवलेला आहे.

२२. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर उमेदवारास अर्ज भरल्याची पोच देणे, चलानची प्रत देणे, चलान भरल्यानंतर *Transition ID update* करणे, ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक कादगपत्रे अर्जदाराकडून स्विकारुन या कार्यालयामध्ये जमा करणे.

२३. दररोज प्राप्त झालेले अर्ज, त्यांची दररोज केलेली डाटाएंट्री, लेखी परीक्षेचे प्रवेशपत्रा बाबतची माहिती दैनंदिन सादर करावी लागेल.

२४. परीक्षेला बसलेल्या उमेदवारांना परीक्षा क्रमांक देणे व त्यांचा आसन क्रमांक/रोल नंबर निश्चित करुन त्यानुसार प्रवेशपत्र तयार करुन द्यावे लागेल.

२५. उमेदवाराचे लेखी परीक्षेकरीताचे प्रवेशपत्र तयार करणे

२६. उमेदवाराचे लेखी परीक्षेकरीता केंद्रनिहाय हजेरीपत्रक तयार करावे लागेल.

२७. पदभरती प्रक्रियेकरिता *OMR* उत्तर पत्रिका छपाई करावी लागेल.

२८. पदभरतीच्या उत्तरपत्रिका तपासण्याकरिता *OMR* मशीन व कर्मचारी उपलब्ध करुन दयावे लागेल.

२९. सदरहू प्रक्रिया कालबध्दरित्या पूर्ण होण्याकरीता आवश्यक मनुष्यबळ व साधन सामुग्री (संगणक प्रिंटर/प्रिंटर कार्टेज, लेखनसामुग्री व इतर अनुषंगीक साहित्य) कंत्राटदाराने उपलब्ध करुन द्यावे लागेल. संगणक सामुग्री, प्रिंटर, कार्टेज, आवश्यक लेखन सामुग्री, व इतर अनुषंगीक साहित्याकरिता वेगळी रक्कम अदा करण्यात येणार नाही. कंत्राटदाराने नमुद केलेल्या प्रति अर्ज दरामध्ये सदर रक्कम समाविष्ट राहील.

३०. कंत्राटदारातर्फे नेमलेल्या अर्ज स्विकृती केंद्राची माहिती व कर्मचाऱ्यांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी लागेल. त्यापैकी कुणीही सदर भरती प्रक्रिये मध्ये अर्ज केलेला नसावा.

३१. सदरहू भरती प्रक्रिये दरम्यान कोणत्याही टप्प्यावर कंत्राटदार किंवा त्यांचे कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार,भ्रष्टाचार,नियमबाह्य कामे, कृति,गैरवर्तुणूक, चुकीच्या नोंदीमुळे गैरप्रकार केल्याचे आढळून आल्यास अनामत रक्कम सरकार जमा करुन त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा

दाखल केला जाईल व त्यांना काळ्या यादी *(Black List)* मध्ये टाकण्याची कारवाई करण्यात येईल.

३२. दिलेले काम असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास किंवा निवीदेतील कोणत्याही शर्ती व अटींचा भंग केल्यास कोणतेही कारण न देता कंत्राटदारास दिलेले काम काढून घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

३३. निवीदाधारकाने संगणक कामाचे मोडयूल तयार करुन त्याचे प्रात्यक्षिक सादर करावे लागेल. प्रात्यक्षिक सादर केल्यानंतर याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम राहील व तो सर्व निवीदाधारकांना बंधनकारक असेल.

३४. व्यापारीक लिफाफा उघडण्यापूर्वी आज्ञावलीचे प्रात्यक्षिक सादर करणे बंधनकारक राहील. जी संस्थचे आज्ञावलीचे प्रात्यक्षिक परिपूर्ण असेल त्याच संस्थेचा व्यापारीक लिफाफा उघडण्यात येईल.

३५. डाटा सेक्यूरिटीसाठी सर्व कम्प्यूटर्स डाटा बेस सर्व्हरशी लॅनव्दारे जोडलेले असावेत व डाटाबेस मध्यवर्ती सर्व्हरमध्येच असावा.

३६. संपूर्ण काम झाल्यानंतर देयक अदा करतांना शासनाचे सर्व प्रकारचे कर कपात करुनच रक्कम अदा करण्यात येईल.

३७. पद भरती कार्यक्रमानुसार आवश्यक असणाऱ्या याद्या व कामे विहीत कालावधीत पूर्ण करणे.

३८. निवीदा फॉर्म तसेच अटी व शर्ती मध्ये नमूद कामाच्या व्यतिरिक्त भरती प्रक्रिये करीता आवश्यक असलेले कोणतेही काम जिल्हाधिकारी यांचे निर्देशानुसार करावे लागेल.

३९. निवीदाधारकास अर्ज स्विकृती केंद्राने परीक्षार्थीकडून आकारावयाच्या सेवाशुल्काबाबत कमाल दर ₹ ५०/- (अक्षरी पन्नास रुपये फक्त) घेणे बंधनकारक राहील. तसेच इतर जिल्हयातील अर्ज भरल्यास सेवा शुल्क त्यांचे स्तरावर घ्यावे त्याबाबत निविदाधारकाला रक्कम आकारता येणार नाही. त्याबाबतचे अर्ज स्विकृतीकेंद्राकडून निवीदाधारकाने ₹ १००/- चे स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन घेणे आवश्यक राहील.

# महाराष्ट्र शासन

## अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय

(गट "क" संवर्गातील पद भरती कामाबाबत-अल्प मुदतीची निविदा सूचना)

**संगणक एजन्सीने करावयाच्या कामाबाबत -निवीदा प्रपत्र**

**लिफाफा क्रमांक -- १**

| अ. क्र. | विवरण | माहीती |
|---|---|---|
| १ | संगणक एजन्सी मालक / भागीदार यांचे नांव व संपुर्ण पत्ता | |
| २ | संगणक संस्थेचा पत्ता (जागेची मालकी/ करारनामाबाबत कागदपत्रे) | |
| ३ | उपलब्ध संगणक/प्रिंटर/इनर्वटर इ. सामुग्रीबाबत तांत्रीक माहीती | |
| ४ | उपलब्ध स्टाफ व त्यांचे पात्रतेविषयी माहीती/अर्ज स्विकृती केंद्राची यादी (स्वतंत्रपणे जोडावी) | |
| ५ | संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक,ई-मेल ॲड्रेस इत्यादी. | |
| ६ | निवीदासोबत जोडलेल्या अमानत रक्कम रू.५०००/- चा ड्राफट क्र. दिनांक इ. | |
| ७ | आपले संगणक एजन्सीव्दारा यापुर्वी केलेल्या भरती प्रक्रियेच्या कामाचा तपशिल. (पुराव्यानिशी) | |
| ८ | वापरण्यांत येणारी आज्ञावली/ संगणक प्रणाली इत्यादीची सविस्तर माहिती. | |
| ९ | वापरण्यात येणारी स्टेशनरी /कागद छपाई इत्यादीचा नमुना Sample) | |
| १० | इतर आवश्यक माहाती - असल्यास | |

वरील अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपुर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हाला मान्य आहेत. त्याचा भंग केल्यास अथवा त्यानुसार कार्यवाही न केल्यास होणारी दंडात्मक कार्यवाही व असे आढळून आल्यास कंत्राट रद्द करण्याचे जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवलेले अधिकार मला / आम्हाला मान्य राहील.

स्थळ :
दिनांक :

निवीदाधारकाची स्वाक्षरी
( निवीदाधारकाचे नांव व संपूर्ण पत्ता)

# महाराष्ट्र शासन

**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय**

**(गट "क" संवर्गातील पद भरती कामाबाबत-अल्प मुदतीची निविदा सूचना)**

**संगणक एजन्सीने करावयाच्या कामाबाबत -निवीदा प्रपत्र**

**लिफाफा क्रमांक -- २ (व्यापारी लिफाफा)**

| अक्र | विवरण | दरपत्रक |
|---|---|---|
| १ | संगणक एजन्सी मालक / भागीदार यांचे नांव व संपुर्ण पत्ता | |
| २ | प्रक्रियेचे संपूर्ण कामाकरीता प्रति अर्ज दर | रु. (आकडयामध्ये)------------------<br>अक्षरात --------------------------- |

वरील अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपुर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हाला मान्य आहेत. त्याचा भंग केल्यास अथवा त्यानुसार कार्यवाही न केल्यास होणारी दंडात्मक कार्यवाही व असे आढळून आल्यास कंत्राट रद्द करण्याचे जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवलेले अधिकार मला / आम्हाला मान्य राहील.

स्थळ :<br>दिनांक :

निवीदाधारकाची स्वाक्षरी<br>( निवीदाधारकाचे नांव व संपूर्ण पत्ता)